दै. नांदेड वार्ता दि. 20.10.25

# गुटखा विक्रेत्यावर पोलीस उपअधिक्षकांच्या पथकाची कारवाई

## १ लाख ३० हजारांचा गुटखा जप्त

मांडवी/प्रतिनिधी-माहूर उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने आज (शनिवार) मांडवी पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मोठी कारवाई करत १ लाख ३० हजार रुपयांच्या किमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधी पान मसाला जप्त केला आहे. या धाडीत अवैध गुटखा विक्री करणाऱ्या एका व्यापाऱ्याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

नुकतेच माहूर उपविभागात रुजू झालेले उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांनी पदभार स्विकारताच अवैध धंद्यांविरुद्ध निर्णायक मोहीम सुरू केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या विशेष पथकाने मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकून ही कारवाई केली. जप्त करण्यात आलेल्या गुटख्याची बाजारमूल्य सुमारे १ लाख ३० हजार असून विविध कंपन्यांच्या प्रतिबंधित ब्रँडचा समावेश आहे. या कारवाईनंतर मांडवी, माहूर आणि सिंदखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटखा व्यवसाय करणाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. भोंडवे यांच्या कडक भूमिकेमुळे या भागातील इतर अवैध धंदे करणाऱ्यांमध्येही धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.